सकाळ 03/08/2016



टेंभ्ये (ता. रत्नागिरी) : टेंभ्ये विद्यालयात गणवेश वाटप केलेल्या विद्यार्थ्यांसोबत मान्यवर.

# टेंभ्ये विद्यालयात गणवेश वितरण

रत्नागिरी, ता. २ : टेंभ्ये येथील माध्यमिक विद्यालयात संस्था सचिव राजाभाऊ साळवी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी कल्याण निधीअंतर्गत व आसमंत फाउंडेशनचे नंदू पटवर्धन यांच्यामार्फत गणवेश वितरण झाले. गणवेश मिळण्यासाठी प्रशालेचे अध्यापक योगेश साळवी यांची विशेष मदत मिळाली. या वेळी संस्था कार्याध्यक्ष अनंत साळवी, खजिनदार उत्तम नागवेकर, उपाध्यक्ष रामचंद्र शिंदे, मुख्याध्यापक ए. एन. तहसीलदार, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. पाचवी ते दहावीतील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना ५० गणवेशाचे वितरण करण्यात आले. २८ गणवेश पटवर्धन यांनी दिले.